# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/11/2023 (शुक्रवार) सकाळ

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कोंढाळी** :– दिनांक ०४/०३/२०२१ चे ०१/१४ वा. दरम्यान यातील फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे अप क्र. ६१/२१ कलम ३५४(ब), ३७६(२)(एफ), ३७६(२)(जे), ३७६(अ,ब) भादवि. सह.क. ४, ६, ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०३/०३/२०२१ चे ११/०० वा. ते ११/१५ वा. दरम्यान यातील नमुद आरोपी नामे– प्रशांत बाळकृष्ण गजभिये, वय २० वर्ष रा. रिंगणाबोळी ता. काटोल याने फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिला घरी बोलावुन घरी कोणी नसतांना पिडीतेच्या तोंडाला कपडा बांधुन तीचे अंगावरील कपडे काढुन पिडीतेशी जबरी संभोंग केला. पिडीता रडल्याने काही होत नाही. कोणाला सांगु नको असे म्हणुन घरी जाण्यास सांगीतले.

सदर प्रकरणाचे तपास सपोनि श्री. विश्वास पुल्लरवार यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. श्री. त्रिवेदी सा. अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालयात सादर केले. आज दिनांक १०/११/२०२३ रोजी मा. श्री. त्रिवेदी सा. अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश यांनी वरील नमुद आरोपीस गुन्हयात कलम ५११ भादवि. तसेच ३७६(अ,ब) भादवि. मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व ५०००/– रू. दंड, दंड न भरल्यास २ महिने साधी कैद. तसेच कलम ३५४(ब) भादवि. मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व २०००/– रू. दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद. तसेच कलम ७, ८ पोक्सो मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व २०००/– रू. दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी बालपांडे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोना /१७०८ पवन येवतकर पो.स्टे. कोंढाळी यांनी मदत केली आहे.

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. रामटेक** :– दिनांक २१/०७/२०१७ चे २२/४८ वा. दरम्यान यातील फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे अप क्र. ४१८/१७ कलम ३६३, ३६६, ३४४, ३७६(२)(एल)(एन), ३७७, ३७०, ५०६ भादवि सहकलम ४/२५ भाहका सहकलम ३(२)(अ), ३(२)(v.a) अनुसचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २१/०७/२०१७ चे एक महिन्यापुर्वी पासुन यातील फिर्यादी ही मतीमंद असल्याने तिचा गैरफायदा घेवुन तिला शिवनी येथुन खुमारी येथे पळवुन आणुन **आरोपी नामे–१) विनोद अमरसिंग जाधव वय ४० वर्ष २) घनश्याम रामसा उईके, वय ३९ वर्ष ३) राधा ब्रिजमोहन तिवारी वय ४५ वर्ष सर्व रा. खुमारी ता. रामटेक यांनी** आपल्या घरी बंदिस्त ठेवुन तिच्या सोबत वारंवार अनैतिक शारीरीक संबंध केले. तसेच फिर्यादीला चाकुचा धाक

दाखवुन विक्री करण्याचा प्रयत्न केला. फिर्यादी ही गोंड आदिवासी जातीची आहे हे माहीत असुन सुध्दा आरोपीने तिच्यासोबत वरीलप्रमाने कृत्य केले.

सदर प्रकरणाचे तपास मा. पोलिस अधीक्षक लोहीत मतानी सो. (सध्या पोलीस अधीक्षक भंडारा ) यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. श्री. पडवळ सा. कोर्ट नं. ०९, जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालयात सादर केले. आज दिनांक १०/११/२०२३ रोजी मा. श्री. पडवळ सा. कोर्ट नं. ०९, जिल्हा न्यायाधीश यांनी वरील नमुद आरोपी क्र १) यास कलम ३६३ भादवि मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व २००० रू दंड. दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास. कलम ३६६ भादवि मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व ३००० रू दंड. दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास. कलम ३७६(२)(जे)(आय)(एन) भादवि मध्ये आजीवन कारावास व ५०००रू दंड. दंड न भरल्यास ०९ वर्ष सश्रम कारावास. कलम ३७७ भादवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व ५०००रू दंड दंड न भरल्यास ०९ वर्ष सश्रम कारावास. कलम ३२३ भादवि मध्ये ०६ महिने सश्रम कारावास व ९००० रू दंड. दंड न भरल्यास ०९ महिने कारावास. कलम ३४४ भादवि मध्ये ०९ महिने सश्रम कारावास व १०००रू दंड. दंड न भरल्यास ०२ महिने कारावास. कलम ५०६ भादवि मध्ये ०६ महिने कारावास व १०००रू दंड दंड न भरल्यास ०१ महिना कारावास. कलम ३७० भादवि मध्ये ०७ वर्ष सश्रम कारावास व ३०००रू दंड दंड न भरल्यास ०६ महिने कारावास.
आरोपी क्र २) यास कलम ३६३ भादवि मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व २०००रू दंड. दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास. कलम ३६६ भादवि मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व ३०००रू दंड. दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास. कलम ३७६(२)(जे)(आय)(एन) भादवि मध्ये आजीवन कारावास व ५०००रू दंड. दंड न भरल्यास ०९ वर्ष सश्रम कारावास.
आरोपी क्र ३) हिला कलम ३६६ भादवि मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व ३००० रू दंड. दंड न भरल्यास ०६ महिने कारावास. कलम ३७० भादवि मध्ये ०७ वर्ष सश्रम कारावास व ३००० रू दंड दंड न भरल्यास ०६ महिने कारावास कलम ३४३ भादवि मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १००० रू दंड दंड न भरल्यास ०२ महिने कारावास. अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी गवळी मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा/२२९ रोहीत मांडवगडे पो.स्टे रामटेक यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**